९५ : ८३/५

sa125 GR No1mpada/gr/com

कोल्हापूर चित्रनगरी महामंडळाचा
विकास खाजगी सहभागातून करणे.

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
शासन निर्णय क्रमांक: कोचिन २००६ / प्र.क्र. २५२ / सांका-१
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १० मार्च,२००८

वाचा:- (१)महाराष्ट्र शासन, अधिसूचना, क्रमांक एमएच/एमआर/साउथ-२२९/२००६-०८, दिनांक १० मे,२००६.

प्रस्तावना:- मराठी चित्रपटांना प्रोत्साहन द्यावे त्यांना सर्व प्रकारच्या सोयी सुविधा, चित्रीकरण स्थळे तसेच आवश्यक त्या पायाभूत सुविधा उपलब्ध व्हाव्यात या उद्देशाने कोल्हापूर चित्रनगरी महामंडळाची स्थापना कंपनी कायदा १९५६ अन्वये दिनांक १४.३.१९८५ रोजी करण्यात आली. या चित्रनगरीच्या स्थापनेनंतर वेगवेगळया कारणाने ही चित्रनगरी अपेक्षित ते उदिष्ट्य साध्य करु शकली नाही. शासनाने तोटयात चालणारी महामंडळे बंद करण्याचा निर्णय घेतला. त्या निर्णयाच्या अनुषंगाने दिनांक ९.११.२००५ रोजी झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीमध्ये कोल्हापूर चित्रनगरी महामंडळासह कांही महामंडळे बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला.त्यानुसार महाराष्ट्र राज्य सार्वजनिक उपक्रम पुनर्रचना मंडळाने कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ बंद करुन त्यांच्या जागेची व इतर साधनसामुग्रीची लिलावाद्वारे विक्री करुन महामंडळाने घेतलेले कर्ज व इतर देण्याची परतफेड करावी व महामंडळाच्या कर्मचा-यांना स्वेच्छानिवृत्ती योजना लागू करावी तसेच महामंडळाचे लेखे तयार करुन ते तपासून घ्यावेत असे निदेश दिले होते. तथापी कोल्हापूर चित्रनगरी बंद करण्यास मराठी चित्रपटसृष्टीचा व स्थानिक जनतेचा विरोध लक्षात घेवून हे महामंडळ बंद न करता कोल्हापूर चित्रनगरीचे पुनरुज्जीवन करण्याबाबतचा प्रस्ताव मंत्रीमंडळास सादर करण्यात आला होता. विचारांती शासनाने खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय:- कोल्हापूर चित्रनगरी बंद करण्यास मराठी चित्रपटसृष्टीचा व स्थानिक जनतेचा विरोध लक्षात घेवून हे महामंडळ बंद न करता कोल्हापूर चित्रनगरीचे पुनरुज्जीवन करण्याबाबत शासनाने खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

१) दिनांक ९.११.२००५ रोजी मंत्रीमंडळाने घेतलेल्या निर्णयापैकी कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ बंद करण्याचा निर्णय रद्द करण्यात येत आहे.

(२) कोल्हापूर चित्रनगरीचा खाजगी सहभागातून विकास करण्यासाठी Expression of interest मागविण्यात यावेत व त्यानंतर आलेल्या देकारांची तुलना करुन जॉईंट व्हेंचर किंवा बी.ओ.टी यापैकी योग्य पर्यायाची निवड करण्यात यावी. कोल्हापूर चित्रनगरीचा सध्याचा संचित तोटा खाजगी

विकास प्रक्रीयेतून भरुन निघाल्यानंतर मुंबई व कोल्हापूर चित्रनगरी यांचे एकत्रिकरण करण्यात यावे.

(३) ही सर्व प्रक्रीया महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ यांच्यामार्फत पूर्ण करण्यात यावी.

३. हा शासन निर्णय, नियोजन विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांचे पत्र क्रमांक अनुक्रमे संकीर्ण २००६/ प्र.क्र.९/का.१४७१, दिनांक २९.११.२००६ व शासाउ १०.०७/प्र.क्र.५२//सा.उ . दिनांक १०.८.२००६ अन्वये निर्गमीत करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

(अ. ना. भोसले)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत.
मा. राज्यपाल यांचे सचिव.
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
मा. उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव.
मा.मुख्य सचिव/अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
महालेखापाल, महाराष्ट्र १ /२ (लेखापरिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर.
सर्व मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
सर्व मंत्रालयीन विभाग.
व्यवस्थापकीय संचालक, दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगांव, मुंबई.
व्यवस्थापकीय संचालक,कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ, कोल्हापूर.
संचालक, सांस्कृतिक कार्य,मुंबई.
विभागीय आयुक्त, पुणे.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
निवडनस्ती-सां.का.१

------